A1-55

F.Y.B.A. sem - II

C-3

# पी एन पी कॉलेज
# अलिबाग
# 2021 - 2022

# पायाभूत अभ्यास

नाव - सोज्वली प्रकाश भगत

क्र. - A1 - 55

विषय :- स्थलांतर

II sem

# पायाभूत अभ्यास

नाव :- शोज्वली प्रकाश भगत.

क्रमांक :- A1 - 55

विषय :- स्थलांतर

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

# अनुक्रमणिका

१) प्रस्तावना

२) स्थलांतर

३) संदर्भ सूची.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

स्थलांतर म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागेत व दुसऱ्या जागेवरून इतर कोणत्याही ठिकाणी लोकांचे जाणे होय. थोडक्यात काय तर जगाच्या एका भागातून लोकांचे दुसऱ्या भागात जाणे म्हणजे स्थलांतर. स्थलांतर हे एका ठिकाणाहून, शहरातून, गावातून, प्रदेशातून, राज्यातून, देशातून दुसऱ्या ठिकाणी शहर, गावात, राज्यात किंवा देशात होते.

जागतिकीकरणामुळे स्थलांतर जागतिक पातळीवर होते. म्हणजेच एका देशातून दुसऱ्या देशात किंवा जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जाणे होय. वास्तव्याचे एक ठिकाण सोडून मानव व्यक्ती किंवा गट दीर्घकाल वास्तव्याच्या हेतूने मानव दुसऱ्या ठिकाणी जातात. या हालचालीस 'मानवाचे स्थलांतर' असे म्हणतात. व्यवसायाच्या निमित्ताने गावोगाव हिंडणे, विद्यार्जनासाठी परदेशात काही काळ राहणे उप-नगरातून शहराच्या मुख्य भागात रोज नोकरी-व्यवसायासाठी जाणे या हालचालींना स्थलांतर म्हणता येणार नाही. 'दीर्घकाळ वास्तव्य' ठरविण्यासाठी किमान एक वर्षाची मर्यादा बहुतेक सर्व देशामध्ये मानली जाते.

प्रागैतिहासिक मानव स्थलांतर करीत पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात गेल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. किंबहुना स्थिर वस्ती करून राहणे ही

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

सांस्कृतिक उत्क्रांती मानली जाते. आणि गेल्या काही सहस्त्रकांमध्येच ती घडली असे अभ्यासकांचे मत आहे. ज्ञात इतिहासात आर्य टोळ्यांचे उत्तर युरोपातून दक्षिणेस व नंतर पूर्वेस आशियात झालेले स्थलांतर इजिप्तमधून ज्यू गुलामांचे उत्तरेकडे झालेले स्थलांतर - एक्सोडस इ.स. सातव्या शतकात अरबांचे इस्लामच्या झेंड्याखाली उ. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत झालेले स्थलांतर ही स्थलांतराची काही महत्वाची उदाहरणे सांगता येतात.

एखादया देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात केले जाणारे ते देशांतर्गत स्थलांतर आणि एका देशातून दुसऱ्या देशात केले जाणारे ते आंतरराष्ट्रीय स्थलांतर अशा दोन प्रमुख प्रकारांमध्ये स्थलांतराच्या अभ्यास केला जातो याशिवाय स्थलांतराचे इतर प्रकार असे : एखाद्या भूप्रदेशावरील सर्वच किंवा बहुसंख्या लोक जेव्हा नैसर्गिक किंवा अन्य आपत्तीमुळे स्थलांतरास प्रवृत्त होतात तेव्हा त्यास प्राथमिक स्थलांतर म्हणतात. राजकिय शक्ती किंवा अन्य आपत्तींमुळे स्थलांतरास प्रवृत्त होतात तेव्हा किंवा अन्य शक्ती बळाच्या वापराने एखादया गटास स्थलांतराची वेळ आणतात त्यास सक्तीचे स्थलांतर म्हणतात. उदा. गुलाम करण्यासाठी पकडून नेणे, एखादया देशाच्या सरकारने हद्दपार करणे इत्यादी. व्यक्ती नावीन्याची ओढ म्हणून किंवा साहस म्हणून स्थलांतर करतात, त्यास ऐच्छिक स्थलांतर म्हणतात.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

बेरोजगार शेतमजूर, अवर्षणप्रवणच्या प्रदेशात पिकांच्या
प्रक्रियांनुसार स्थलांतर होत त्यास हंगामी स्थलांतर
म्हटले जाते उदा. महाराष्ट्रात अवर्षणप्रवणच्या
जिल्ह्यांतून येणारे मजूर. एका अप्रगत प्रदेशातून
मोठ्या संख्येने प्रगत प्रदेशात स्थलांतर होते त्यास
सामूहिक स्थलांतर म्हणतात. उदा. एखाद्या खेड्यातून
तालुक्याच्या गावी, तेथून जिल्हाकेंद्रापर्यंत तेथून
प्रांताची राजधानी अशी ही साखळी दिसून
येते. तसेच या साखळीत प्रथम काही लोक
स्थलांतर करतात ते मित्र नातेवाईकांना स्थलांतरास
उद्युक्त असतात करतात अशा प्रकारे अनेकांचे
साखळी स्थलांतर होते.

# स्थलांतर

स्थलांतराचे प्रकार :-

१) स्थानिक स्थलांतर - स्थानिक पातळीवर

२) ग्रामीण ते शहरी स्थलांतर - औद्योगिकरणामुळे ग्रामीण ते शहर

३) एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात - उत्तर भारतें ते मुंबई भाग

४) नागरी भागातून ग्रामीण भागात जाणे - भारतामध्ये शक्यतो नाही पण राहणीमान खर्चीक कारणामुळे होऊ शकते.

५) सामूहिक स्थलांतर - मोठी धरणे, तलाव मुळे भौगोलिक स्थलांतर

६) सक्तीचे स्थलांतर - उपक्रम राबविण्याकरीता शासनाच्या आदेशावर

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

स्थलांतराचे समाजशास्त्र या विषयाच्या अभ्यास करताना विद्यार्थ्यांना मूलभूत प्रश्न असा पडतो की स्थलांतर म्हणजे काय ? भारताच्या संदर्भात विचार केल्यास असे दिसून येते की शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकांच्या मध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. स्थलांतर करताना लोक मुख्यत्वे आपल्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणापासून ~~अर~~ अनेक कारणांसाठी दुसऱ्या ठिकाणी जात असतात. पुर्वी लोक मुख्यत्वे अन्नधान्याच्या शोधात स्थलांतर करत असत आणि आज लोक शिक्षण, नोकरी व व्यापारासाठी स्थलांतर करताना दिसून येतात. स्थलांतर करताना लोक मुख्यत्वे ज्या ठिकाणी जायचे आहे त्याचे अगोदर फायदा तोटा याचा विचार करतात आणि मगच स्थलांतर करत असतात. या प्रकरणामध्ये आपण स्थलांतराची संकल्पना समजून घेणार आहोत.

मानवाचे पृथ्वीतलावर अस्तित्व आसल्यापासून तो आपल्या गरजांचे ~~बिं~~ निवाटळ व सुरक्षित निवारा शोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहिला. मानवाच्या विकसित अवस्था म्हणजे भटके जीवन सोडून त्याने स्थिर जीवन जगण्यास प्रारंभ केला. परिणाम सुरक्षा व सत्ता आकर्षणामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर होत असे लहान गावातून मोठ्या गावाकडे लहान ठिकाणाहून मोठ्या ठिकाणाकडे आर्थिक सोई आणि सुविधा रोजगार दळणवळणाच्या सोई उपलब्ध आहे अशा

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

अशा ठिकाणी स्थलांतर घडून आहे.
प्रा. हॉले यांच्या मतानुसार, सुसंस्कृत व प्रगत लोकच अधिक प्रमाणात स्थलांतर करु शकतात स्थलांतर हे अल्पकालीन, दीर्घकालीन तात्पुरते किंवा कायमस्वरुपाचे असते.
थोडक्यात स्थलांतर प्रक्रिया मध्ये मुख्यत्वे आपल्या मूळ वास्तव्य ठिकाणापासून अनेक कारणासाठी दुसऱ्या ठिकाणी जावून वास्तव्य करतात. पुर्वी लोक भूक भागवण्यासाठी भटकंती करण्यातून स्थलांतर होत होते. आज शिक्षण, आरोग्याच्या सोई, रोजगार, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी सुरक्षा स्थलांतरीत होतात.

स्थलांतराची संकल्पना -

स्थलांतराची प्रक्रीया ही प्राचिन काळापासून चालू आहे. ही प्रक्रीया निरंतर चालू राहणारी सामाजिक प्रक्रिया आहे. प्राचीन काळात, निसर्गातील अनाकालीन घटना आकस्मित बदल, भूकंप, पाऊस, वादळ, महापूर या पर्यावरणातील घटकांशी समायोजन साधून आपली उपजिवीका भागवण्याच्या उद्देशाने आदिवासी आपल्या टोळीसह एका ठिकाणाहून जेथे पर्यावरण मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवण्यास अनुकूल आहे अशा ठिकाणी ते नव्याने राहत असे. याचे मुख्य कारण नैसर्गिक साधनसंपत्ती असमानता असल्याने वाढुसऱ्या प्रदेशात अधिक नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असल्यास स्थलांतर घडून येते.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

ज्या प्रदेशातून लोक दुसरीकडे जातात (Emigration - out - Migration) तेथील प्रदेशातील लोकसंख्या कमी होते व लोकसंख्या ज्या प्रदेशात केंद्रित होते तेथे लोकसंख्या वाढते विकसनशील देशात स्थलांतर हे मुख्यत: पुरुषाचे जास्त प्रमाणात होते. विकसनशील देशामध्ये देशांतर्गत व ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर आर्थिक विकासाला उपयुक्त ठरते आहे.

स्थलांतर ही लोकसंख्येच्या रचनेत व आकार व सामाजिक परिवर्तनास गती प्राप्त करुन देणारा महत्वाचा घटक आहे. ज्ञानाच्या प्रसार वाढला, लोकशाहीची तत्व रुजवली गेली. मानवाची कार्यक्षमता, विचारक्षमता, बुद्धीमता, उदयोग धंदे व व्यापार, रोजगार संधी उपलब्ध तसेच वाहतूकीच्या साधनांमुळे इच्छित ठिकाणी लोक जाऊ शकतात, येऊ शकतात त्यामुळे स्थलांतर वेगाने घडून येत आहे.

लोक का ठिकाणावरुन दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी जाऊन अल्पकाळ, दिर्घकाळ, कायमचे वास्तव्य करतात त्यास स्थलांतर म्हणावे. भारतासारख्या देशामध्ये, स्थलांतर व त्याची कारणे ही काळानुरुप बदलत गेली. आहेत. स्थलांतराची प्रक्रीया ही सातत्याने घडणारी गोष्ट आहे. स्थलांतर एक नैसर्गिक प्रक्रिया असून ती सतत चालू राहते.

भारताच्या संदर्भात स्थलांतराची प्रक्रीया ही १९ व्या शतकाच्या पुर्वार्धानंतर मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली. औद्योगिक व शहरीकरणाची प्रक्रीया सुरु झाल्यावर ग्रामीण भागाकडून शहरी भागांच्याकडे

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

स्थलांतराच्या प्रक्रियेने वेग घेतला. शहरीकरणानंतर सुरू झालेल्या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाकडून शहरांकडे तसेच एका शहराकडून दुसऱ्या शहरांकडे स्थलांतर होवू लागले. स्थलांतराच्या नियम म्हणून किंवा ती एक स्वाभाविक प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये स्थलांतर करणारे सुरवातीला आपल्या गावाहून / मूळ वस्तीस्थाना पासून जवळच्या छोट्या शहरांकडे व नंतर तिथून मोठ्या शहरांकडे स्थालांतर करतात.

स्थलांतराची प्रक्रिया ही वय, लिंग, शिक्षण या प्रमुख गोष्टीवर अवलंबून असते. शक्यतो ग्रामीण भागातील युवक शहरांकडे नोकरी - धंद्याच्या शोधात स्थलांतर करत असतात. काही तरूण मात्र शहराकडे चंगळवादी दृष्टीने आकर्षित होवून स्थलांतर करत असतात. स्थलांतराच्या प्रक्रीयेमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने कमी असलेले दिसून येते. शैक्षणिक दृष्ट्या प्रगतीपथावर असणाऱ्या शहरांमध्ये युवकांची शिक्षण घेण्याची स्थलांतर होताना दिसते. तर दुसऱ्या बाजूला खेळ, मैदानी स्पर्धा व सांस्कृतिक दृष्ट्या विकसित झालेल्या शहरांमध्ये त्या दृष्टिची आवड असणारे लोक स्थलांतरीत होताना दिसतात. व्यापार व उद्योगाच्या दृष्टिने विकसित झालेल्या शहरांमध्येही नोकरी धंद्याच्या शोधात असणारा युवकवर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतो.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

अंतर्गत स्थलांतर व बहिर्गत स्थलांतर:

(Internal Migration and External Migration)

१) अंतर्गत स्थलांतर :-

ज्यावेळी एखादी व्यक्ती किंवा समूह देशांतर्गत स्थलांतर करतो त्या प्रक्रियेला अंतर्गत स्थलांतर म्हटले जाते. उदा. ऊस तोडणीच्या कालखंडामध्ये स्थलांतरीत होणारे मजूर हे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरित होताना दिसतात. भारतासारख्या कृषीप्रधान व विकसनशिल देशामध्ये अलिकडच्या काळात अंतर्गत स्थलांतराची प्रक्रिया गतीमान झाल्याचे दिसून येते.

१९९० नंतर भारताने स्विकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणामुळे अंतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेला वेग आलेला आहे. यापूर्वी काही ठराविक शहरापुरतच मर्यादित असणारी स्थलांतराची प्रक्रिया सर्वच शहरापर्यंत येवून पोहचलेली आहे. गेल्या दोन दशकामध्ये देशांतर्गत होणाऱ्या अशा पद्धतीच्या अंतर्गत स्थलांतरामुळे शहरीकरणाची प्रक्रीया झपाट्याने वाढत आहे. मुख्यत्वे करून ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतराचा वेग वाढलेला आहे असे दिसून येते.

अंतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेमुळे भारताची ३५% लोकसंख्या ही शहरामध्ये स्थलांतरीत झालेली दिसून येते.

२) बर्हिगत स्थलांतर

ज्यावेळी एखादी व्यक्ती किंवा समूह देशाबाहेर स्थलांतर करतो त्या प्रक्रियेला बर्हिगत स्थलांतर म्हटले जाते. अशा स्वरुपाचे स्थलांतर हे तात्पुरते किंवा कायम अशा दोन्ही प्रकारचे असू शकते. या पद्धतीच्या स्थलांतरामध्ये मोठ्या प्रमाणात विकसनशिल देशातील लोक विकसित किंवा प्रगत देशामध्ये शैक्षणिक किंवा नोकरी - धंद्याच्या निमित्ताने स्थलांतरीत होत असतात. अशाच पद्धतीने या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये प्रगत किंवा विकसित राष्ट्राकडून प्रगत किंवा अविकसित राष्ट्रांच्या सामाजिक समस्यांच्या सोडवणूकीसाठी अनेक उच्च विद्याविभूषित लोक तसेच स्वयंसेवा प्रतिनिधी स्थलांतरित होत असतात.

आजच्या आधुनिक युगामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात अद्यावत ज्ञानाची सातत्याने भर पडत आहे. या अनुषंगाने या माहितीच्या प्रसार करण्यासाठी तसेच लोक कल्याणासाठी त्याचा वापर व्हावा म्हणून मानवी समूह एका जागेहून दुसऱ्या जागी सतत स्थलांतर करताना दिसून येतो. अंतर्गत स्थलांतरामध्ये लोक खेड्याकडून शहराकडे व शहराकडून महानगराकडे स्थलांतर होत असतात त्याप्रमाणे बर्हिगत स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये, अविकसित देशाकडून विकसनशिल देशाकडून विकसित देशाकडे स्थलांतर करताना दिसून येतात.

स्थलांतराची कारणे :-

१) आर्थिक घटक

२) सामाजिक घटक

३) पर्यावरणात्मक घटक

४) आरोग्य विषयक

५) राजकिय घटक.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

१) आर्थिकरण :-

२१ व्या शतकामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने उद्योगधंद्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यायाने रोजगार निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करु लागलेत.

२) शिक्षण :-

आपल्या पाल्याच्या भविष्याचा विचार करुन मोठ्या प्रमाणात पालक ज्या शहरामध्ये चांगल्या शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत अशा ठिकाणी आकर्षित होवून लोक स्थलांतर करत असतात.

३) चांगले राहणीमान :-

ज्या ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध आहेत तसेच विविध प्रकारच्या सेवा उदा. आरोग्य, शिक्षण, क्रिडा, सांस्कृतिक गरजा भागविणारी केंद्रे उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी लोक आकर्षित होवून लोक स्वइच्छेने स्थलांतर करतात.

४) नैसर्गिक आपत्ती :-

भूस्खलन, भूकंप, महापूर, त्सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे मानवाला नाईलाजाने अनेक ठिकाणाहून स्थलांतर करणे भाग पडते.

FOR EDUCATIONAL USE
Sundaram

स्थलांतर प्रक्रियेचा अर्थ अथवा प्रमुख व्याख्या :-

१) डॉ. एस. सी. दुबे
'स्थलांतर ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे, की ज्याद्वारे लोकसंख्येचे अंतर्गमन आणि बहिर्गमन होते.

२) वर्गल
' वर्गल यांच्या मते, "लोकसंख्येच्या स्थानांतरासाठी दिलेले नाव म्हणजे स्थलांतर होय"

स्थलांतर प्रक्रियेतील प्रेरक आणि प्रेषक स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन स्थलांतर प्रवृत्ती व योजना, स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन आणि स्थलांतर व नागरीकरण इ. अर्थात यासंदर्भातील विस्तृत विवेचन करण्यापूर्वी आपणास स्थलांतराची कारणे आणि विविध परिणाम माहित करून घेणे खूप आवश्यक आहे.

स्थलांतर प्रक्रियेचे परिणाम :-

जेव्हा ग्रामीण भागातील अथवा खेड्यातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात खेड्यातून शहराकडे स्थलांतर करतात तेव्हा अशा शहरामध्ये स्थलांतर प्रक्रियेचे खालील अनेक दुष्परिणाम किंवा सामाजिक समस्या निदर्शनास येतात.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

१) लोकसंख्येमध्ये वाढ

ग्राम-नगर स्थलांतर अथवा देश-विदेश स्थलांतर प्रक्रियेने संबंधित शहराच्या अथवा देशाच्या लोकसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत जाते भूपृष्ठ मर्यादित आणि लोकसंख्या अमर्यादीत यामुळे शहरवासियांना भयंकर विविध सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. शहरी वसती किंवा झोपडपट्टी वाढ, वाहतूक, दळणवळण साधनांची कमतरता आणि विविध प्रकारचे प्रदूषण यासारख्या समस्यांनी प्रचंड वाढ होते.

२) बेकारी किंवा नोकरीचा अभाव :-

रोजगार संधी अथवा नोकरीची शाश्वती या भूमिकेतून खेड्यातील व्यक्तींना वाढता ओघ शहराकडे वाढत जातो तेव्हा शहरातील बहुसंख्य व्यक्ती बेकार अथवा नोकरीचा अभाव असे जीवन जगतात याचा परिणाम म्हणजे अशा बेकार व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीचा आसरा घेतात. याचा अर्थ स्थलांतर अथवा प्रक्रियेने गुन्हेगारी प्रवृत्तीची वाढ केली जाते. असे म्हणता येईल.

३) समयोजन साधणे शक्य नसते,

स्थलांतर प्रक्रियेमध्ये जेव्हा देशाच्या विविध खेड्यातील व्यक्ती मोठ्या शहराकडे

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

अथवा महानगरांच्याकडे स्थलांतर करतात तेव्हा खेड्यातील अशा व्यक्तिंना शहरी जीवन पद्धती जुळवून घेता येत नाही. सहाजिकच मानसिक दृष्ट्या स्थलांतरीत व्यक्ती शहरामध्ये जावून सुद्धा असमाधानी जीवन जगतात. कमी पगारात शहरामध्ये राहणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. थोडक्यात आपणास असे निदर्शनास येते कि, स्थलांतर प्रक्रियेचे ग्रामावासियांच्या दृष्टीने सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि लोकसंख्यात्मक परिणाम आढळून येतात. त्यामुळेच आपणास सदर घटकामध्ये खालील अनेक बाबींचा विस्तारपूर्वक आढावा घेणे गरजेचे आहे.

प्रशिक्षित किंवा उच्च शिक्षित कामगार वर्ग.

समाजशास्त्रज्ञांच्या मते प्राचीन काळी भारतामध्ये अनेक व्यक्ती गृह उद्योगामध्ये गुंतलेल्या होत्या. त्यांच्याकडून स्वतःच्या उपभोगा पुरते शेती उत्पादन घेतले जात होते. यंत्राच्या आभावाने मर्यादित उत्पादन घेतले जात असल्याने उत्पादित मालाला बाहेरील बाजारपेठ मिळत नव्हती. दर्जेदार मालाच्या आभाव होत.

परंतु औद्योगिक क्रांतीनंतर शेती व्यवसायाचे यांत्रिकीकरण झाल्याने खेड्यातील व्यवसाय उपजिविकेचे साधन बनण्यास असमर्थ ठरु लागले. अशावेळी ग्रामीण भागातील अनेक लोक कामधंदा शोधण्यासाठी खेड्यातून शहराकडे स्थलांतर करु लागले. याला ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती असे म्हटले जाते.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

१) शहरांची मागणी व ग्रामीण भागातील कारागीर वर्गाचा पुरवठा

स्थलांतर प्रक्रियेत मोठ मोठ्या शहरामध्ये ग्रामीण भागातून मजूर अथवा कारागीर वर्गाची मागणी सतत वाढत आहे. शहरांमध्ये खेड्यापेक्षा अधिक सोयी व सुविधा उपलब्ध असतात. इच्छेनुसार कोणताही व्यवसाय करण्याची संधी मिळते. कामाच्या मोबदला पैशामध्ये मिळतो तसेच जादा कामाचा मेहनताना जादा मिळत असल्याने खेड्यातील अनेक लोक आपणाहून शहराकडे आकर्षिले जातात. यामुळे ग्राम-नगर स्थलांतर घडून येते. थोडक्यात मोठमोठ्या शहरांमध्ये शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याने तसेच शहरामधील जीवन विषयक स्थिती प्रगतीला चालना देणारी असल्याने अनेक ग्रामवासिय शहराकडे ओढले जातात. औद्योगिक, व्यवसायिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक शहरांमध्ये सध्या बाहेरील लोकांना ओढण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे दिसून येते.

३) शहरांमधील प्रगतीला चालना देणारी स्थिती

समाजशास्त्रीय दृष्ट्या अनेक विचारवंतांच्या मते शहरामधील जीवन विषयक स्थिती प्रगतीला अथवा विकासाला चालना देणारी असल्याने भारताच्या विविध खेड्यातील व्यक्ती सातत्याने आज देखील शहराकडे स्थलांतर करताना आढळून येतात. शहरात्या जागेची टंचाई, झोपडपट्टी किंवा गलिच्छ वसती निर्मितीला जबाबदार ठरत आहे. अशावेळी नगरवासियांना असंख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# संदर्भ सूची

https:/sheth.flipick.com

P Ratn
04/04/22

Sundaram
FOR EDUCATIONAL USE